रक्षाबंधन

| वर्ष - 8 | अंक - 43 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज TM

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 19 ऑगस्ट 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Maha enews

## रस्त्यांवर पाण्याचे लोंढे; ती एक चूक अन् महिलेचा हादरवणारा अंत

# पुण्यात पावसाने दाणादाण!

### जागोजागी पाणी भरलं, रस्त्यांवर पाण्याचे लोंढे साचले

**। पुणे ।महाईन्यूज**

**सलग दुसऱ्या दिवशी रविवारी संध्याकाळी ढगाच्या गडगडाटासह झालेल्या पावसाने मध्यवर्ती पुण्यासह पूर्व पुण्याला झोडपले. लोहगाव, येरवडा, हडपसर, कात्रज, येवलेवाडी भागात अचानक पावसाचा जोर वाढल्याने कामानिमित्त बाहेर पडलेल्या नागरिकांना घरी परताना गुडघ्याएवढ्या पाण्यातून वाट काढत जावे लागले. उपरस्त्यांबरोबरच अनेक सोसायट्यांमध्येही पाणी शिरल्याने नागरिकांची तारांबळ उडाली. वडगाव शेरी भागात ढगफुटी सदृश पाऊस पडल्याने दोन तासांत १११ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. जागोजागी पाणी भरलं, रस्त्यांवर पाण्याचे लोंढे साचले. यामध्येच एका महिलेला विजेचा धक्का लागून तिचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे.**



संबंधित वृत्त पान 2 वर



### रस्त्यांवर पाण्याचे लोंढे

शहरात पाऊस कोसळला असला तरी लोVणावळा, मावळ भाग वगळता जिल्ह्यातील बहुतांश भागात पाऊस पडला नाही. धरणक्षेत्रातही दिवसभरात पावसाच्या हलक्या सरींची नोंद झाली. रविवारी सकाळी हवेत गारवा नव्हता. दुपारपर्यंत उकाडा वाढत गेला आणि संध्याकाळी पाचच्या सुमारास शहरात सर्वदूर पावसाला सुरुवात झाली. महापालिकेने ड्रेनेजची स्वच्छता केलेली असली तरी रविवारी पावसाला जोर जास्त असल्याने मुख्य रस्त्यांसह अंतर्गत रस्त्यांवर पाण्याचे लोंढे वाहत होते. काही भागात वाट न मिळाल्याने रस्त्यावर गुडघाभर उंचीचे पाणी साठले. त्यामुळे रस्त्यावर चारचाकी गाड्याही पाण्यात होत्या.

### दुचाकी पाण्यात

वडगाव शेरी, लोहगाव, येरवडा भागात दुचाकी पाण्याखाली गेल्या होत्या. त्या भागातील काही सोसायट्या, वसाहतींमधील घरांमध्येही पाणी शिरले. त्यामुळे वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता. हडपसर, वानवडी, कात्रज भागालाही पावसाने झोडपले. रस्त्यावर पाणी साठल्याने ठिकठिकाणी वाहतूक विस्कळित झाली होती. बाजारपेठांमधून घराच्या दिशेने निघालेल्या नागरिकांना वाहतूक कोंडीसह विविध समस्यांचा सामना करावा लागला. कात्रज भागातही सायंकाळी पाचनंतर पावसाला सुरुवात झाली आणि थोड्या वेळातच जोर वाढला.

### टिंबर मार्केटमध्ये पाणी

पूर्व पुण्यातील उपनगरांबरोबरच मध्यवर्ती पुण्यात गंजपेठ, टिंबर मार्केटमधील मोठ्या प्रमाणात पाणी साठले होते. रस्त्याला नाल्याचे स्वरूप आले होते. टिंबर मार्केटमधील दुकानांमध्ये पाणी शिरल्याने नागरिक रस्त्यावरून उतरून पाण्याला वाट करून देण्यासाठी प्रयत्न करत होते. काही गल्ल्यांमध्ये कंबरेच्या उंचीएवढे पाणी साठले होते. पावसामुळे उपनगरांमधील वीजपुरवठा विस्कळित झाला, काही ठिकाणी झाडपडीच्या किरकोळ घटनांची नोंद झाली.

### विजेच्या धक्क्याने महिलेचा मृत्यू

**कोंढवा खुर्द येथील भाग्योदयनगर परिसरात रस्त्यात साचलेल्या पाण्याच्या डबक्यात विजेचा प्रवाह उतरल्याने पादचारी महिलेचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला. कल्पना रमेश विश्वकर्मा (वय ३२, रा. कोंढवा खुर्द) असे मृत महिलेचे नाव आहे. मृत महिला रविवारी सायंकाळी भाग्योदयनगर येथून पायी घरी जात होती. पावसाच्या पाण्यामुळे तयार झालेल्या एका डबक्यात तिचा पाय पडला आणि महिला रस्त्यावर कोसळली. त्या पाण्यात वीजेचा प्रवाह उतरला असल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली.**

# पुणे रेल्वे स्थानक 'पाण्यात'!

## बॅग, सामानासह पाण्यातून वाट काढण्याची प्रवाशांवर वेळ

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पावसामुळे पुणे रेल्वे स्थानकाच्या प्रवेशद्वारातच आता तळे साचू लागले आहे. या गुडघाभर पाण्यातून वाट काढत प्रवाशांना स्थानकाच्या आतमध्ये पोहोचावे लागत आहे. एवढ्यावरच प्रवाशांचे दिव्य संपत नसून, गळके फलाट प्रवाशांच्या स्वागतासाठी तयार आहेत. या सगळ्यातून कसरत करीत जीवावर उदार होत रेल्वे गाडीत चढण्याचे आव्हान सध्या प्रवाशांना पेलावे लागत आहे.**



पुणे रेल्वे स्थानकाच्या गेल्या काही वर्षांपासून दुरवस्था झाली आहे. पावसाळ्यात या स्थानकाची अवस्था अतिशय खराब होते. गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पावसामुळे स्थानकाच्या आवारात मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. आपला तोल सांभाळायचा की हातातील बॅगा सांभाळायच्या असा प्रश्न प्रवाशांसमोर उभा राहत आहे. या गुडघाभर पाण्यातून वाट काढताना प्रवाशांची तारांबळ उडत आहे. याचबरोबर अनेक फलाटांवर पावसाचे पाणी गळत आहे. यामुळे हे फलाट निसरडे झाले आहेत. रेल्वे गाडी आल्यानंतर प्रवासी मोठ्या संख्येने गाडी पकडण्यासाठी धावतात. या निसरड्या फलाटांमुळे मोठा अपघात घडण्याचा धोका निर्माण झाला आहे.

अनेक प्रवाशांनी समाज माध्यमांतून याबाबत संताप व्यक्त केला आहे. अनेक जणांनी रेल्वे स्थानकातील साचलेल्या पाण्याची छायाचित्रे आणि चित्रफितीही समाज माध्यामावर टाकल्या आहेत.

रेल्वे स्थानकात प्रवेश करताना आणि बाहेर पडताना कशा प्रकारे प्रवाशांना कसरत करावी लागत आहे, याबद्दलचे चित्र अनेकांनी यातून दाखविले आहे. रेल्वे प्रशासनाने मात्र प्रवेशद्वारापेक्षा बाहेरील रस्त्याची उंची वाढल्याचे कारण पाणी साचण्यासाठी दिले आहे. ही समस्या तातडीने निदर्शनास आली असून, कर्मचारी उपाययोजना करीत आहेत, असे उत्तरही रेल्वे प्रशासनाने दिले आहे.

" पुणे रेल्वे स्थानकावर पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी योग्य उपाययोजना केलेल्या नाहीत. त्यामुळे प्रवेशद्वारासह स्थानकाच्या आवारात मोठ्या प्रमाणात पाणी साचले. प्रवाशांना सामानासह स्थानकात प्रवेश करणे अतिशय अडचणीचे बनले आहे. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांची काळजी घेणे गरजेचे आहे.

-**हर्षा शहा,** अध्यक्षा, रेल्वे प्रवासी ग्रुप

" पुणे रेल्वे स्थानकातील फलाटांवर पावसाचे पाणी गळत आहेत. यामुळे ते निसरडे झाले असून, प्रवाशांसाठी असुरक्षित बनले आहेत. विशेषत: लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी ते धोकादायक बनले आहेत. स्थानकाच्या दुरूस्तीची वारंवार मागणी प्रवाशांकडून केली जात असून, त्याकडे रेल्वे प्रशासन दुर्लक्ष करीत आहे..

–**विकास देशपांडे,** सदस्य, विभागीय रेल्वे सल्लागार समिती

# राहुल गांधींना होऊ शकतो कारावास

## पुणे कोर्टात हजर राहण्याचे आदेश

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी वादग्रस्त वक्तव्य केल्याप्रकरणी काँग्रेस नेते राहुल गांधी यांना प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार आज, सोमवारी पुणे न्यायालयात हजर राहून आपले म्हणणे मांडावे लागणार आहे. या आदेशाच्या पूर्ततेसाठी राहुल गांधी न्यायालयात हजर राहून आपले म्हणणे मांडणार का, याविषयी उत्सुकता आहे. मात्र, 'समन्स' मिळाल्यानंतरही ते गैरहजर राहिल्यास त्यांच्याविरोधात अटकेचे वॉरंट निघू शकते, असे सूत्रांनी सांगितले.**

या प्रकरणी सावरकरांचे नातू सात्यकी सावरकर यांनी न्यायालयात दावा दाखल केला आहे. तक्रारीत तथ्य आढळून आल्याने न्यायालयाने राहुल गांधी यांना हजर होण्याचा आदेश दिला आहे. गांधी यांनी लंडनमध्ये अनिवासी भारतीयांसमोर केलेल्या भाषणात सावरकरांचा संदर्भ देऊन आक्षेपार्ह विधान केले होते. त्यावर सात्यकी सावरकर यांनी गांधी यांच्याविरोधात मानहानीचा फौजदारी दावा दाखल केला आहे. या प्रकरणात फौजदारी प्रक्रिया संहितेच्या 'कलम २०२'नुसार सखोल तपास करून अहवाल सादर करण्याचा आदेश प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अक्षी जैन यांनी दिला होता. याची पूर्तता न केल्याने पोलिसांना नोटीसही बजावण्यात आली होती. अखेर पोलिसांनी तपासणी अहवाल सादर केला. त्यामध्ये राहुल गांधी यांच्या वक्तव्याबाबत सात्यकी सावरकर यांनी केलेल्या तक्रारीत तथ्य आढळून आल्याचे ेलिसांनी या अहवालात नमूद केले आहे.



### .. तर दोन वर्षे तुरुंगवास

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी वादग्रस्त वक्तव्य केल्याप्रकरणी राहुल गांधी यांच्याविरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम ५०० व फौजदारी प्रक्रिया संहितेच्या २०० अन्वये तक्रार दाखल आहे. या प्रकरणात दोषी आढळल्यास कमाल दोन वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षेची तरतूद आहे.

### 'समन्स' पूर्तता महत्त्वाची

राहुल गांधी यांना 'समन्स' बजावण्याची पूर्तता झाल्यास, त्याचा अहवाल न्यायालयात येईल. त्यानंतरही राहुल गांधी न्यायालयात हजर झाले नाहीत, तर अटकेचे वॉरंट काढले जाते. परंतु, 'समन्स' बजावण्याची पूर्तता झाली नसेल, तर प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे या प्रक्रियेच्या पूर्ततेवर राहुल गांधी न्यायालयात हजर राहणार की नाही, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# सुनीता केजरीवाल यांनी शरद पवारांची भेट घेतली

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या पत्नी सुनीता केजरीवाल यांनी आज पुण्यात 'राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार' पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली. यावेळी त्यांच्यासोबत आपचे खासदार संजय सिंह हेही उपस्थित होते. महाराष्ट्र निवडणुकीपूर्वी ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. अर्धा तास चाललेल्या या बैठकीतून अनेक अर्थ काढले जात आहेत. या बैठकीमुळे आम आदमी पक्ष महाविकास आघाडीत सामील झाल्याच्या चर्चेला उधाण आले आहे. महाराष्ट्रात काही दिवसातच विधानसभेच्या निवडणुका जाहीर होणार आहेत. या निवडणुकीत आप पक्षालाही महाआघाडीत स्थान मिळण्याची शक्यता आहे. सध्या विरोधी महाविकास आघाडी पक्षात शिवसेना (उद्धव ठाकरे गट), राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट) आणि काँग्रेस पक्ष यांचा समावेश आहे. महायुतीमध्ये भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांचा समावेश आहे. यावेळी झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने चांगली कामगिरी केली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाने ८, काँग्रेसला १३ आणि शिवसेना (उद्धव गट) ९ जागा जिंकल्या होत्या. यामुळे आता महाविकास आघाडीने विधानसभेची जोरदार तयारी केली. यामुळे आता आम आदमी पक्षही विधानसभेच्या रिंगणात उतरणार असल्याची चर्चा सुरू आहे. आम आदमी पार्टीच्या मुंबई अध्यक्षा प्रीती शर्मा मेनन यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना एक मोठं विधान केलं होतं. लोकसभा निवडणुकीसाठी इंडिया आघाडी स्थापन झाल्याचे ते म्हणाले होते. विधानसभा निवडणुका हा वेगळा विषय आहे. यामध्ये स्थानिक मुद्द्यांवर निवडणूक लढवली जाणार आहे. पक्ष महाराष्ट्र विधानसभा निवडणूक स्वबळावर लढणार असून मुंबईतील सर्व ३६ जागांवर उमेदवार उभे करणार असल्याचे त्यांना सांगितले होते.

## एकाच जागी अनेक वर्षे नेमणुकीस असलेल्या

# कर्मचाऱ्यांची लवकरच उचलबांगडी!

### 'अ', 'ब' 'क' संवर्गातील 34 अधिकारी तर 437 कर्मचारी हे बदलीसाठी पात्र

। पिंपरी।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिकेत वर्षानुवर्षे एकाच जागी अधिकारी, कर्मचारी ठाण मांडून बसले आहेत. त्यात 'अ' आणि 'ब' संवर्गातील ३४ अधिकारी तर 'क' मधील ३३२ कर्मचारी आणि तांत्रिक संवर्गातील ७१ असे ४३७ कर्मचारी हे बदलीसाठी पात्र झालेले आहेत. या ठाण मांडलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या ऑगस्टअखेरीस बदल्या करण्यात येणार आहेत.**



मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महापालिका सेवेतील 'अ' ते 'ड' संवर्गातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसंदर्भात २०१५ मध्ये धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार एप्रिल व मे महिन्यात बदल्या करणे अपेक्षित असते. मात्र, लोकसभा निवडणुका असल्याने कर्मचाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या झाल्या नाहीत. त्यामुळे महापालिकेच्या विविध विभागांत कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी, मुख्य लिपिक, लिपिक, सहायक भांडारपाल, लेखापाल, उपलेखापाल यासारख्या पदांवर अनेक वर्षे ठाण मांडून बसलेले अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या बदल्या होण्याची शक्यता धूसर होती. मात्र, आयुक्त शेखर सिंह यांनी 'अ' ते 'ड' संवर्गातील जे अधिकारी, कर्मचारी हे एप्रिल व मे २०२४ या महिन्यात बदलीस पात्र ठरत होते. त्यांची आणि ज्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना वैयक्तिक, वैद्यकीय कारणास्तव बदली पाहिजे अशा कर्मचाऱ्यांची माहिती मागविली होती. त्यानुसार विभागप्रमुखांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह बदलीसाठी पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती सामान्य प्रशासन विभागाकडे सादर केली आहे.

#### ऑगस्टअखेर बदल्या केल्या जाणार

एकाच विभागात तीन वर्षे कालावधी पूर्ण झाला आहे. त्यात स्थापत्य, विद्युत विभागाचे तीन कार्यकारी अभियंता, १४ उप अभियंता, दोन माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, दोन उपायुक्त, तीन सहायक आयुक्त, तीन प्रशासन अधिकारी, एक लेखाधिकारी, सहायक आरोग्य अधिकारी असे २९ वरिष्ठ अधिकारी बदलीस पात्र आहेत. तर, बदलीसाठी एक सह शहर अभियंता, चार उपअभियंता आणि एका सहायक आरोग्य अधिकारी अशा पाच अधिकाऱ्यांनी अर्ज सादर केला आहे. 'क' संवर्गातील ३३२ आणि तांत्रिक संवर्गातील ७१ कर्मचारी बदलीसाठी पात्र आहेत. बदलीसाठी पात्र झालेल्या कर्मचाऱ्यांची माहिती आली आहे. ऑगस्टअखेर या कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या

---

## भोसरी मतदार संघात ५० हजाराहून अधिक 'लाडकी बहीण' लाभार्थी

### 'महायुती' सरकारच्या योजनेला महिलांचा वाढता प्रतिसाद

#### महापालिकासह सर्व शासकीय विभागांची शहरात लगबग

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील महायुती सरकारने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना घोषित केली. या योजनेला पिंपरी-चिंचवडमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. भोसरी विधानसभा मतदार संघामध्ये तब्बल ५० हजाराहून अधिक महिलांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.**

पुण्यातील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा नगरी येथे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, महिला व बाल कल्याण विकास मंत्री आदिती तटकरे यांच्या उपस्थितीमध्ये "वचनपूर्ती" सोहळा संपन्न झाला. त्यापूर्वीच, लाभार्थी महिलांच्या खात्यावर पैसे जमा झाले आहेत

आतापर्यंत राज्यात १ कोटी ८ लाख महिलांना या योजनेचा लाभ झाला असून, १ कोटी ३५ लाख महिलांनी या योजनेसाठी नोंदणी केली आहे. महिलांना योजनेचे अर्ज भरण्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत मुदत आहे. अर्ज भरल्यानंतर त्यांना जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्याची एकत्रित रक्कम त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येणार आहे.

दरम्यान, पिंपरी-चिंचवडमधील महिलांनी या योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. गेल्या महिनाभरामध्ये तब्बल १ लाख ६० हजाराहून अधिक महिलांनी योजनेसाठी अर्ज केले आहेत. दि. १६ ऑगस्ट २०२४ पर्यंत शहरातून १ लाख ५० हजार ७३५ इतके अर्ज पात्र ठरले आहेत. या लाभार्थींच्या खात्यावर पैसे जमा झाल्यामुळे महिला वर्गात समाधान व्यक्त होत आहे.



> 'शेवटच्या घटकाचा विकास' अर्थात अंत्योदय हा भारतीय जनता पार्टी व महायुतीचा अजेंडा आहे. राज्यातील महायुती सरकारने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' घोषीत केली. त्यावेळी यावर टिका झाली. पण, आजच्या घडीला राज्यात सुमारे १ कोटी ३५ लाख आणि शहरात १ लाख ५० हजाराहून अधिक महिलांनी या योजनेचा लाभ घेतला. भोसरी विधानसभा क्षेत्रामध्ये हा आकडा ५० हजाराहून अधिक आहे. राज्यात महिला भगिनींसाठी 'मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजने'च्या माध्यमातून वर्षाला ३ गॅस सिलेंडर मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. जनतेची सेवा हेच शासनाचे ध्येय असून, प्रत्येक योजना याद्दष्टीनेच गतीने राबविण्यात येत आहे, ही बाब निश्चित स्वागतार्ह आहे.
>
> **–महेश लांडगे,**
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड

---

## पिंपरी-चिंचवडमध्ये अनोखे ध्वजारोहण; तृतीयपंथी व्यक्तीला ध्वजारोहण करण्याचा दिला मान



। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

पिंपरी-चिंचवड शहरामध्ये एक अनोखे ध्वजारोहण पाहायला मिळाले. समाजपासून दूर जात असलेल्या तृतीयपंथी यांच्या हस्ते खासगी शाळेतील ध्वजारोहण करण्यात आले.

पिंपरी-चिंचवड शहरामध्ये एक अनोखे ध्वजारोहण पाहायला मिळाले. समाजपासून दूर जात असलेल्या तृतीयपंथी यांच्या हस्ते खासगी शाळेतील ध्वजारोहण करण्यात आले. हा उपक्रम नाना काटे यांच्या माध्यमातून राबवण्यात आला. तृतीयपंथी यांच्याकडे नेहमीच वेगळ्या नजरेने पाहिल्या जाते. मात्र, त्यांना देखील त्यांचा समान हक्क मिळाला पाहिजे या उद्देशातून हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

तृतीयपंथी निकिता मुख्यादल यांनी देखील समाधान व्यक्त केला असून याचप्रमाणे समाजातील प्रत्येक गोष्टीत आमचा विचार करण्यात यावा असे आवाहन देखील त्यांनी केल आहे. देशभर ७८ वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात येत आहे. पिंपरी-चिंचवड शहरात देखील शासकीय आणि खासगी अशा दोन्ही ठिकाणी स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला आहे.पिंपळे सौदागर येथील खासगी शाळेत साजरा करण्यात आलेला स्वातंत्र्य दिवस अनोखा ठरला. माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्यासह तृतीयपंथी निकिता मुख्यादल यांनी ध्वजारोहण केलं.



## भूमिका

**महाराष्ट्रात आणि राज्यातही महिला अत्याचार वाढत असताना राखी पौर्णिमेनिमित्त बहिणींचे संरक्षण करण्याचे बंधन संबंधित यंत्रणांसाठी महत्त्वाचे आहे. कोलकात्यापाठोपाठ डेहराडूनमध्ये आयएसबीटी बसमध्ये अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचाराची बातमी आली. देशात सातत्याने महिला अत्याचाराच्या घटना घडत असताना 'लाडक्या बहिणी'च्या सुरक्षिततेचाही प्रश्नही महत्त्वाचा आहे.**

# केवळ पैसे नको, रक्षण करा!

महाराष्ट्रात सध्या जातीय आणि धार्मिक मुद्दे राजकारणाच्या केंद्रस्थानी आहेत. या धार्मिक आणि जातीय विषयांच्या 'प्रचारकी' धुरळ्यात विधानसभेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातही अगदी अलिकडेच झालेल्या महिला अत्याचार आणि हत्येच्या घटनांचे विस्मरण व्हायला नको. तसेच निवडणुकांसाठीचे उपयोग मूल्य म्हणून या घटनांना जातीय किंवा धार्मिक चष्म्यातून पाहिले जाणे राजकारणासाठी जरी फायद्याचे ठरत असले तरी समाजकारणासाठी ते धोक्याचेच ठरणार आहे.

लाडकी बहीण योजनेतून बहिणींच्या खात्यात ३० अब्ज ९० कोटी रुपये जमा केल्याची बातमी बहिणींसाठी आनंदाची आहे, परंतु असे होत असताना देश आणि राज्यातील बहिणींच्या सुरक्षेची जबाबदारीही सुरक्षा, सरकारी, तपास यंत्रणेतील 'भावांनी' घ्यायला हवी. यासोबतच या देशाच्या नागरिक असलेल्या भावांनीही 'लाडक्या बहिणीं'ना संविधानाला



अभिप्रेत असलेल्या प्रतिष्ठेने जगण्याच्या हमीचेही संरक्षण करायला हवे. अलिकडच्या काळात महिला अत्याचाराच्या महाराष्ट्रात घडलेल्या घटना सामाजिक चिंतेचा विषय झाल्या आहेत. यात बेकायदा गर्भलिंग निदानापासून ते स्त्री भ्रूणहत्या, ऑनर किलिंग, बलात्कार, मानवी तस्करी, कौटुंबिक हिंसाचार, समुपदेशनाचा अभाव, महिलांचे मानसिक आरोग्य, हुंडाबळी, अंधश्रद्धेतून जाणारे महिलांचे बळी, महिलांच्या वाढलेल्या आत्महत्यांमागील कारणे, जातीय अत्याचार, छायाचित्रे किंवा व्हिडीओ सार्वजनिक करण्याची भीती घालून मानहानीची धमकी आदी अनेक गुन्हे आहेत.

केंद्रीय गृह विभागाने महाराष्ट्र राज्यातून बेपत्ता झालेल्या मुली आणि महिलांची आकडेवारी उपलब्ध केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात वर्ष 2019 मध्ये 35900 तसेच वर्ष 2020 मध्ये 30089 आणि वर्ष 2021 मध्ये 34663 मुली आणि महिला बेपत्ता झाल्या आहेत. या बेपत्ता महिला किंवा मुलींमागे मानवी तस्करी, कथित लव्ह जिहाद, ऑनर किलिंग किंवा इतर कारणांची माहिती घ्यायला हवी. रोजच्या बातम्यांमध्ये फूस लावून अल्पवयीन मुली तसेच सज्ञान महिला मुलींना पळवून नेल्याच्या बातम्या असतात. यातील ही बाजूही सामाजिक दृष्टीकोनातून समोर यायला हवी.

महाराष्ट्रातील बेपत्ता महिला आणि मुलींची संबंधित आकडेवारी ही नोंद प्रकरणांची असल्याने जी प्रकरणे नोंद झालेली नाहीत, त्यांची संख्या यात नसल्याचे स्पष्ट व्हावे. अशी कित्येक प्रकरणे नोंद होत नाहीत, त्यामागील कारणांचीही दखल घ्यायला हवी, कित्येक प्रकरणात सामाजिक बदनामीची भीती कारण असते. अनेक प्रकरणातील आरोपी हे धनाढ्य किंवा समाजावर प्रभाव टाकणारे असल्याने त्यांच्या दबावाखाली कमकुवत गटातील पीडितांना माघार घ्यावी लागते. मागील वर्षाच्या सुरुवातीपासून ते पहिल्या पाच महिन्यात राज्यात जवळपास साडेपाच हजार मुली, महिला बेपत्ता झाल्याची माहिती गेल्या वर्षी विधानसभेत देण्यात आली होती. यावर सत्ताधाऱ्यांनी हा प्रश्न राष्ट्रीय स्तरावरील असल्याचे सांगितले, मात्र यातून मार्ग काढण्यासाठी किंवा या प्रकरणांचा छडा लावण्यासाठी आवश्यक उपाययोजनांविषयी उहापोह केला नाही. ही गृहीत धरण्याची वृत्ती सोडून त्याविषयी गांभीर्य बाळगायला हवे. राज्यातील महिला किंवा मुलींच्या बेपत्ता होण्यामागील सामाजिक कारणांचा विचार करता गरीबी, उपासमार, लैंगिक गरजा आदी कारणेही यामागे आहेत. अल्पवयीन मुलींच्या बेपत्ता होण्यामागील कारणांमागे बरेचदा कौटुंबिक अस्थिरता आणि आधुनिक मौजमजेच्या जीवनशैलीचे आकर्षण ही कारणे समोर येतात. फूस लावून पळवून नेण्यामागच्या कारणांमागे लग्नाचे आमिष दाखवणे हे कारण प्रकर्षाने समोर येते. लग्नाचे आमिष दाखवण्यात चांगल्या संसाराची हमी देऊन भौतिक सुखाचे आमिष दाखवले जाते. दुसऱ्या प्रकारात कौटुंबिक स्तरावरील असुरक्षितता हा प्रकारही समोर आला आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या स्फोटामुळे आधुनिक जगातील जगण्याच्या नव्या संकल्पना समोर येत आहेत. या नव्या संकल्पनांना अंधपणे स्वीकारून क्षणिक प्रेमाच्या जाळ्यात फसवून अल्पवयीन मुलींना पळवून नेले जाण्याचे प्रमाण वाढले आहे. मानवी तस्करीमागील सामाजिक कारणांचा तपास व्हायला हवा.

## प्रासंगिक »

### आता सेक्युलर

***देशवासियांना संबोधित करताना समान नागरी कायद्याचा सेक्युलर सिव्हिल कोड असा उल्लेख केला,***

आपल्या देशात समान नागरी कायदा लागू झाला तर नेमके कोणते बदल होणार याबाबत नागरिकांना पूर्ण माहिती नाही. समान नागरी कायदा हा भारतीय जनता पक्षाच्या हिंदुत्ववादी राजकारणाचा एक अविभाज्य भाग आहे, असाही आरोप केला जात आहे. जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० हटविणे, अयोध्येतील राम मंदिर आणि समान नागरी कायदा हे तीन मुद्दे भाजप व त्याआधीचा जनसंघासाठी महत्वाचे राहिलेले आहेत. तसेच वारंवार आपण मोदी सरकार व भाजपच्या नेत्यांकडून देशात समान नागरी कायदा लागू होईल अशी विधाने ऐकली आहेत. समान नागरी कायद्याचा सर्वात सोपा अर्थ म्हणजे सर्वांसाठी सारखे नियम असणे. आपला भारत देश विविधतेने नटलेला आहे. जेथे प्रत्येकाला आपल्या धर्मानुसार जगण्याचे स्वातंत्र्य आहे. तेथे हा कायदा लागू करणे शक्य आहे का? किंवा लागू केल्यास त्याचा काय परिणाम होणार याचा विचार करावा लागणार आहे.

रक्षाबंधनाची सुरुवात केव्हा झाली, याबद्दल निश्चित पुरावा नाही; पण त्याविषयी एक आख्यायिका आहे. पूर्वी देवदानवांच्या युद्धात दानवांच्या शक्तीपुढे देवांचे काही चालत नसे. दानवांचा राजा वृत्रासुर याने देवांचा राजा इंद्र याला युद्धाचे आव्हान दिले. इंद्र आपले वज्र घेऊन युद्धास निघाला.

# उत्कट प्रेमाचे अतूट रेशीम बंध!

त्या वेळी इंद्राला विजय मिळावा म्हणून त्याची पत्नी शुची हिने विष्णूकडुन मिळालेला एक दोरा (राखी) इंद्राच्या हातावर बांधला. त्या राखीच्या प्रभावाने इंद्राला त्या युद्धात विजय मिळेल, अशी तिची श्रद्धा होती. शेवटी श्रध्दा खरी ठरली आणि इंद्राचा विजय झाला आणि त्याचे गेलेले वैभव परत मिळाले. या प्रसंगाची आठवण म्हणून मनगटावर राखी बांधण्याची पद्धत पडली, असे सांगितले जाते. हिंदू पौराणिक कथेनुसार, महाभारतात, जे एक महान भारतीय महाकाव्य आहे, पांडवांची पत्नी द्रौपदीने भगवान श्रीकृष्णाच्या मनगटामधून वाहणारे रक्त थांबवण्यासाठी तिने तिच्या साडीचा कोपरा फाडून त्याच्या मनगटावर बांधला. त्यामुळे भगवान श्रीकृष्ण यांच्यात एक बंध निर्माण झाला आणि द्रौपदीचे रक्षण करण्याचे वचन त्यांनी तिला दिले. राखी बांधताना बहिणीने म्हणावे, "येन बद्धो बली राजा दानवेन्द्रो महाबलः। तेन त्वामनुबध्नामि रक्षे मा चल मा चल" (दानवांचा राजा



बली यांच्या हातात दैत्यगुरू शुक्राचार्य यांनी जशी रक्षा (राखी) बांधली होती तशीच ही राखी मी तुझ्या हाताला बांधत आहे)श्रावणमास पर्व हे समाज जीवनाचे प्रतिबिंब आहे. रक्षाबंधन हे एक सामाजिक व धार्मिक पर्व आहे. हे पर्व सामाजिक परंपरेमध्ये सद्भाव, स्नेह, आत्मियता, बंधुभाव, कौटुंबिक एकात्मता यांचा प्रवाह निर्माण करणारे आहे. खऱ्या अर्थाने संस्कृतीला समृध्द बनविणारे, आध्यात्मिक स्पर्शाने जनमनाला पुलंकित करणारे पर्व आहे, रक्षाबंधन पर्व! राणी कर्णावतीने आपल्या रक्षणासाठी हुमायुँ राजाला भाऊ मानून बांधलेली राखी इतिहासाच्या पानावर कोरल्या गेली. हिंदू-मुस्लिम यांच्यामधील स्नेह व एकी निर्माण करणारी ही जीवंत साक्षच आहे. 'स्त्री' जातीच्या रक्षणासाठी धर्म, जाती, लिंग या भेदांना छेदून पुढे टाकलेले एक पाऊल आहे हे ! राष्ट्रीय एकात्मेला पोषक व वर्धक प्रसंग समाजात सद्भावना व सत्प्रवृत्तींचे पोषण करण्याचे कार्य करतात. आपल्या भाऊरायाला बहीण राखी बांधते व आपल्या रक्षणाची अप्रत्यक्षरीत्या हमी घेते. हिंदू संस्कृतीतील समाजमुल्यांचे पोषण करणारी ही सामाजिक परंपरा आजही मोठया दिमाखाने देशात सर्वत्र नांदतांना दिसत आहे. उत्तर भारतातील ग्रामीण भागांत जिथे अनेक खेड्यांमध्ये बहिर्विवाह पद्धती प्रचलित आहे, तिथे मोठ्या संख्येने विवाहित हिंदू स्त्रिया दरवर्षी त्यांच्या पालकांच्या घरी सणासाठी परत जातात. त्यांचे भाऊ, जे विशेषतः पालकांसोबत किंवा जवळपास राहतात, कधीकधी त्यांच्या बहिणींच्या विवाहित घरी त्यांना परत घेऊन आणण्यासाठी जातात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# येणाऱ्या काळात मोठ्या घडामोडी होणार!

## भाजपने अजित पवारांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवले

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उपमुख्यमंत्री अजित पवारांची जनसन्मान यात्रा जुन्नर विधानसभा क्षेत्रात पोहचली असता भाजपच्या जुन्नर विधानसभा प्रमुख आशा बुचके काळी साडी परिधान करून रस्त्यावर उतरल्या आणि त्यांनी थेट अजित पवारांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवले. यामुळे महायुतीत मिठाचा खडा पडल्याचे चित्र आहे.**



आज जुन्नरमध्ये पर्यटन विषयाची शासकीय बैठक पार पडत असताना आम्हाला का डावलण्यात आले? महायुती आहे तर मग मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे फोटो बैठकीत का नाहीत? पालकमंत्री म्हणून फक्त अजित पवारांचा फोटो का लावण्यात आला? या जुन्नर विधानसभेत नेमकं काय शिजतंय? असे अनेक प्रश्न उपस्थित करत बुचकेंनी पालकमंत्री अजित पवारांना धारेवर धरलं. अजित पवारांच्या जन सन्मान यात्रेत आज सकाळीच नारायणगाव येथील निलायम गार्डन मंगल कार्यालयात विविध बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. अजित पवारांचा ताफा या ठिकाणी पोहोचला असता भाजपाच्या माजी जिल्हा परिषद अध्यक्ष आशा बुचके यांच्यासह कार्यकर्त्यांनी काळे झेंडे दाखवत घोषणाबाजी केली. पर्यटन तालुका असताना शासकीय कार्यक्रम घेऊन घटक पक्षांना डावलं जात असल्याचा आरोप आंदोलकांनी केले. अजित पवारांनी घटक पक्षांना डावलून पालकत्वाची भूमिका पाळली नाही याबाबत तीव्र शब्दात नाराजी व्यक्त करतो असे म्हणज आशा बुचकेंसहीत त्यांच्या कार्यकर्त्यांनी अजित पवारांच्या कार्यक्रमात काळे झेंडे दाखवण्यासाठी तयारी करत घोषणाबाजी सुरू केली. अजित पवारांचा ताफा ज्या ठिकाणावरुन बैठकींचं आयोजन करण्यात आलेल्या सभागृहात जात होता त्याच मार्गावर हे आंदोलन करण्यात आलं. या प्रकरणामुळे आता महायुतीमध्ये खडा पडणार की काय? अशी चर्चा रंगलेली असतानाच अजित पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी आशा बुचकेंना चांगलेच फैलावर घेतलं आहे. बुचकेंनी अजित पवारांना काळे झेंडे दाखवण्याचा प्रकार हा निव्वळ स्टंटबाजी असल्याचा टोला रुपाली चाकणकरांनी लगावला आहे. बुचकेंच्या या अजित पवारविरोधी भूमिकेने महायुतीत कोणताही खडा पडणार नाही, असा दावा ही चाकणकरांनी केला आहे. ही राष्ट्रवादी पक्षाची जनसन्मान यात्रा असल्यानं अजित पवारांनी ही बैठक बोलावली होती. जागच्याजागी समस्यांचं निराकरण व्हावं म्हणून शासकीय अधिकाऱ्यांना बोलावलं होतं, याचा अर्थ ही शासकीय बैठक होती असा होत नाही, विरोधातील काही नेत्यांना फक्त आमच्यावर बोलण्यात रस आहे, आम्ही अशा आरोपांना थारा देत नाही. जन सन्मान यात्रेच्या प्रत्येक दिवसाच्या शेवटी महायुतीचा बैठक होत आली आहे अन् ती यापुढंही होईल,

### महायुतीत मिठाचा खडा

नितेश राणेंच्या माध्यमातून सरकारला पोलिसांचे मनोबल तोडायचं आहे का?, असा सवाल प्रकाश आंबेडकरांनी उपस्थित केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवारांची जनसन्मान यात्रा जुन्नर विधानसभा क्षेत्रात पोहचली असता भाजपच्या जुन्नर विधानसभा प्रमुख आशा बुचके काळी साडी परिधान करून रस्त्यावर उतरल्या आणि त्यांनी थेट अजित पवारांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवले. यामुळे महायुतीत मिठाचा खडा पडल्याचे चित्र आहे.

असंही चाकणकरांनी स्पष्ट केलं.

दरम्यान, अजित पवार यांच्या ताफ्याला भाजप कार्यकर्त्यांनी काळे झेंडे दाखवल्यामुळे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आक्रमक झाले आहेत. सुनील तटकरे म्हणाले, मुळात त्यांनी काळे झेंडे दाखवण्याचं काही कारण नाही, त्यांनी निदर्शने करण्याची आवश्यकता नव्हती. कारण हा आमच्या पक्षाचा अंतर्गत कार्यक्रम आहे. त्यामुळे कोणीही गैरसमजातून किंवा राजकीय हेतूने अशी निदर्शने करू नये. घटक पक्षाने अशा प्रकारे काळे झेंडे दाखवू नये.अजित पवारांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवले यावरून प्रकाश आंबेडकर यांनी महत्वाचे भाष्य केले आहे. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, येणाऱ्या काळात काही मोठ्या घडामोडी होणार आहेत. त्यासाठी जनतेने तयार राहावं, असं म्हणत भविष्यात मोठ्या राजकीय घडामोडींचे सुतोवाच त्यांनी केले आहे. ते अकोला येथे धनगर समाजाच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमानंतर माध्यमांशी संवाद साधताना बोलत होते. गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमात बोलताना प्रकाश आंबेडकरांनी धनगर समाजाला राजकीय आवाहन केलं. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत आरक्षणवाद्यांना मतदान करा. टाळ कुटणाऱ्यांना मतदान केलं तर 1990 च्या आधीची परिस्थिती येईल, असा इशारा प्रकाश आंबेडकरांनी दिला. येणाऱ्या विधानसभेत आरक्षणाला धोका आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत आरक्षणाची शिडी वाचवायची की नाही? याचा विचार धनगर समाजाने करावा, असं त्यांनी यावेळी म्हटले.

---

# 17 ऑगस्ट: लाडकी बहीण दिन म्हणून साजरा करूया

## विरोधकांना खायला कंदी पेढे पाठवा : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विरोधकांना खायला कांदी पेढे पाठवा, असं मुख्यमंत्री शिंदे साताऱ्यामधील लाडकी बहीण लाभार्थींच्या कार्यक्रमातील भाषणात म्हणाले. सरकार पडेल असं विरोधक म्हणत होते पण सरकार मजबूत होत गेलं त्यामुळे महिला बहीणींच्या खात्यात पैसे जमा झाले. आपल्या सहकार्यामुळे ही योजना यशस्वी झाली आहे. देशाच्या पंतप्रधानांच्या पाठीशी उभे राहणारे हे सरकार आहे.**

आमदार भास्कर जाधव सध्या पुन्हा सरकार आल्यास दीड हजाराचे तीन हजार करू. लखपती झालेली बहिण पहायची आहे. अनेक महिलांच्या डोळ्यामध्ये आनंद अश्रू होते. विरोधक हे सावत्र भाऊ यांनी खोडा घालण्याचा प्रयत्न केला. योजनेत खोडा घालणाऱ्यांना जोडा दाखवा, हाच खऱ्या आर्थाने माहेरचा आहेर आहे. दर महिन्याला ही ओवाळणी आहे. विरोधकांना लाज वाटली पाहिजे. विरोधकांमध्ये मळमळ, जळजळ झाली तरी त्यांना शंभूराज देसाई त्यांना जमाल गोटा देतील. महिलांचा महासागर आज पहायला मिळाला. साताऱ्यात कार्यक्रम झाला याचा एक वेगळा आनंद आहे कारण ही माझी



जन्मभूमी आहे, असं म्हटलं. पुढे बोलताना, आम्ही भाग्यवान आहोत कारण आपल्या सारख्या बहिणी मला मिळाल्या. कोट्यवधी बहिणी मला मिळाल्या. हा सर्वात सुपर डूपर हिट झालेला कार्यक्रम आहे," असंही मुख्यमंत्री म्हणाले. कालच या लाडकी बहीण योजनेची सुरुवात झाली आहे. 3 हजार कोटी महिला भगिनींच्या खात्यात पैसे जमा झाले आहेत, असं सांगताना मुख्यमंत्र्यांनी या योजनेसाठी राज्य

### महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास

टप्या-टप्याने ही रक्कम तीन हजार रुपयांपर्यंत करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडक्या बहिणींना दिली. लाडक्या बहिणींबरोबरच शासन युवक, शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी अशा सर्वांनाच बळ देत आहे. त्यासाठी मुख्यमंत्री अन्नपूर्ण योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण योजना, मुख्यमंत्री तिर्थदर्शन योजना, मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना या योजनांना गती देण्यात येत आहे. विविध योजनांच्या माध्यमातून महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शासन प्रयत्न करित आहे.

शासनाने 35 हजार कोटी रुपयांची तरतूद केल्याचं सांगितलं आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' ही अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि क्रांतिकारी योजना आहे. ही योजना लाडक्या बहिणींसाठी कायमस्वरुपी सुरु राहणार आहे. या आर्थिक वर्षात योजनेसाठी 35 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्याची आर्थिक स्थिती जसजशी मजबूत होत जाईल.

# निर्भयाच्या आईचा ममता बॅनर्जींवर संताप!

## ममता बॅनर्जी यांच्या राजीनाम्याची केली मागणी

| नवी दिल्ली |

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**कोलकात्यामधील प्रशिक्षणार्थी डॉक्टर तरुणीवर बलात्कार करून तिची हत्या केल्याच्या घटनेने देशभरात खळबळ उडाली आहे. या डॉक्टर तरुणीच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा यासाठी देशभरातील डॉक्टरांच्या संघटना रस्त्यावर उतरल्या आहेत. दरम्यान, दिल्ली बलात्कार प्रकरणातील पीडिता निर्भयाची आई देखील कोलकात्यामधील पीडितेच्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी पुढे सरसावली आहे. निर्भयाची आई आशा देवी यांनी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या राजीनाम्याची मागणी करत म्हटलं आहे की "त्या स्थिती सांभाळण्यात अपयशी ठरल्या आहेत. त्यामुळे त्यांनी त्यांचं पद सोडलं पाहिजे".**



आशा देवी यांनी पीटीआयशी संवाद साधला. यावेळी त्या म्हणाल्या, "पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या गुन्हेगारांवर कारवाई करण्याऐवजी, मुख्यमंत्री म्हणून त्यांच्याकडे असलेली क्षमता वापरून स्थित सांभाळण्याऐवजी त्या स्वतः आंदोलन व निषेध करत आहेत. याद्वारे त्या केवळ लोकांचं लक्ष विचलित करण्याचा, मुख्य मुद्द्यावरून लोकांचं लक्ष वळवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्या स्वतः महिला असूनही हे प्रकरण गांभीर्याने हाताळताना दिसत नाहीत. त्यांनी राज्याच्या प्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडायला हवी होती, दोषींवर कठोर कारवाई करायला हवी होती. मात्र त्या या कामात अपयशी ठरल्या आहेत. राज्यातील परिस्थिती हाताळण्यात अपयशी ठरल्यामुळे त्यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा."२०१२ मध्ये दिल्लीत एका तरुणीवर (निर्भया – बदलेलं नाव) बलात्कार झाल्यानंतर तिला न्याय मिळवून देण्यासाठी देशभरातील लोक रस्त्यावर उतरले होते. निर्भयाच्या आईसह संपूर्ण कुटुंबाने तब्बल आठ वर्षे न्यायालयीन लढा देऊन २० मार्च २०२० रोजी निर्भयाला न्याय मिळवून दिला व गुन्हेगारांना फाशीची शिक्षा झाली. कोलकात्यातील बलात्काराच्या घटनेने लोकांना निर्भया प्रकरणाची आठवण झाली आहे. दरम्यान, निर्भयाच्या आईने, कोलकाता बलात्कार व खून प्रकरणावर भाष्य केलं. त्या म्हणाल्या, "देशातील परिस्थिती अजूनही तशीच आहे. कोलकात्यात डॉक्टर तरुणीबरोबर जे काही घडलं, आतापर्यंत जो काही तपास केला गेला आहे ते पाहून अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. हे बलात्कार व खून प्रकरण, त्याबाबत पोलिसांनी केलेला तपास, आतापर्यंत झालेली कारवाई पाहता असं वाटतंय की आपण अजूनही २०१२ मध्येच आहोत. देशातील परिस्थिती तीळमात्र बदलेली नाही". आशा देवी यांनी पीटीआयशी संवाद साधला. यावेळी त्या म्हणाल्या, "पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या गुन्हेगारांवर कारवाई करण्याऐवजी, मुख्यमंत्री म्हणून त्यांच्याकडे असलेली क्षमता वापरून स्थित सांभाळण्याऐवजी त्या स्वतः आंदोलन व निषेध करत आहेत. याद्वारे त्या केवळ लोकांचं लक्ष विचलित करण्याचा, मुख्य मुद्द्यावरून लोकांचं लक्ष वळवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्या स्वतः महिला असूनही हे प्रकरण गांभीर्याने हाताळताना दिसत नाहीत. त्यांनी राज्याच्या प्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडायला हवी होती, दोषींवर कठोर कारवाई करायला हवी होती. मात्र त्या या कामात अपयशी ठरल्या आहेत. राज्यातील परिस्थिती हाताळण्यात अपयशी ठरल्यामुळे त्यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा."२०१२ मध्ये दिल्लीत एका तरुणीवर (निर्भया – बदलेलं नाव) बलात्कार झाल्यानंतर तिला न्याय मिळवून देण्यासाठी देशभरातील लोक रस्त्यावर उतरले होते. निर्भयाच्या आईसह संपूर्ण कुटुंबाने तब्बल आठ वर्षे न्यायालयीन लढा देऊन २० मार्च २०२० रोजी निर्भयाला न्याय मिळवून दिला व गुन्हेगारांना फाशीची शिक्षा झाली. कोलकात्यातील बलात्काराच्या घटनेने लोकांना निर्भया प्रकरणाची आठवण झाली आहे.कोलकाता बलात्कार व खून प्रकरणावर भाष्य केलं. त्या म्हणाल्या, "देशातील परिस्थिती अजूनही तशीच आहे. कोलकात्यात डॉक्टर तरुणीबरोबर जे काही घडलं.

### देशातील परिस्थिती बदलेली नाही

बलात्कार व खून प्रकरण, त्याबाबत पोलिसांनी केलेला तपास, आतापर्यंत झालेली कारवाई पाहता असं वाटतंय की आपण अजूनही २०१२ मध्येच आहोत. देशातील परिस्थिती तीळमात्र बदलेली नाही". कोलकात्यामधील प्रशिक्षणार्थी डॉक्टर तरुणीवर बलात्कार करून तिची हत्या केल्याच्या घटनेने देशभरात खळबळ उडाली आहे. या डॉक्टर तरुणीच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा यासाठी देशभरातील डॉक्टरांच्या संघटना रस्त्यावर उतरल्या आहेत. दरम्यान, दिल्ली बलात्कार प्रकरणातील पीडिता निर्भयाची आई देखील कोलकात्यामधील पीडितेच्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी पुढे सरसावली आहे. निर्भयाची आई आशा देवी यांनी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या राजीनाम्याची मागणी करत म्हटलं आहे.

---

# एअर इंडियाच्या महिला क्रू मेंबरशी गैरवर्तन

## एअर इंडियाच्या महिला क्रू मेंबरला लंडनमध्ये मारहाण

| नवी दिल्ली |

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**लंडन येथील एका मोठ्या हॉटेलमध्ये एअर इंडियातल्या एका महिला सदस्याला ( AIR INDIA CREW ) मारहाण करण्यात आली. तिच्याशी गैरवर्तन आणि तिला मारहाण झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी आम्ही स्थानिक पोलिसांकडे संपर्क केला आहे असं एअर इंडियाने म्हटलं आहे. या प्रकरणी पुढील तपास सुरु आहे.**




समोर आलेल्या माहितीनुसार लंडनमध्ये हिथ्रोमध्ये असलेल्या रेडिसन रेड या हॉटेलमध्ये एअर इंडियाच्या महिला क्रू मेंबरला ( AIR INDIA CREW ) मारहाण झाली आहे. या हॉटेलच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत स्टाफने चिंता व्यक्त केली होती. अशात ही घटना घडल्याचं समोर आलं आहे. समोर आलेल्या माहितीनुसार महिला क्रू मेंबर तिच्या रुममध्ये झोपली होती. त्यावेळी एक माणूस रात्री १.३० वाजण्याच्या सुमारास तिच्या खोलीत शिरला. त्यावेळी या महिला क्रू मेंबरला जाग आली. त्यावेळी त्या माणसाला पाहून तिने आरडाओरड सुरु केली. ज्यानंतर तिच्या खोलीत घुसलेल्या हल्लेखोराने कपडे अडकवायच्या हँगरने या क्रू मेंबरला ( AIR INDIA CREW ) मारहाण केली आणि तिचे केस ओढून तिला फरफटत नेलं. ही घटना घडत असताना सदर महिला ओरडत होती. तसंच ही महिला खोलीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत होती पण खोलीत आलेला तो माणूस तिला बदडत होता. आरडाओरड ऐकून इतर लोक धावले त्यांनी या माणसाला पकडलं आणि एअर इंडियाच्या क्रू मेंबरला रुग्णालयात दाखल केलं. गुरुवारी रात्री ही घटना घडल्याचं एअर इंडियाने म्हटलं आहे.

### काय आहे हे संपूर्ण प्रकरण?

एअर इंडियाच्या प्रवक्त्यांनी याबाबत माहिती दिली की, "जी घटना आमच्या क्रू मेंबरसह झाली ती अतिशय वेदनादायी आहे. आम्ही आमच्या टीमच्या संपर्कात आहोत. एअर इंडिया यातील कायदेशीर गोष्टी तपासते आहे. तसंच पोलिसांशीही आम्ही संपर्क केला आहे. आमचे क्रू मेंबर आणि त्यांची सुरक्षा ही जबाबदारी सर्वोतोपरी आमची आहे" असं एअर इंडियाचे प्रवक्ते म्हणाले. इंडिया टुडेने हे वृत्त दिलं आहे.नुकत्याच समोर आलेल्या माहितीनुसार सदर मारहाण झालेली महिला ( AIR INDIA CREW ) भारतात परतली आहे. सध्या तिचं समुपदेशन करण्यात येतं आहे.

# रणबीर कपूरचा बोट पकडून राहाने पाहिलं नवं घर



गेल्या कित्येक महिन्यांपासून रणबीर कपूर व आलिया भट्टचं वांद्रे येथील नव्या घराचं बांधकाम सुरू आहे. २५० कोटींचा खर्च करून रणबीर व आलिया हे नवं घर उभारत आहेत. त्यामुळे सतत दोघं आपल्या नव्या घराची पाहणी करताना दिसतात. आज (१८ ऑगस्ट) नव्या घराची पाहणी करण्यासाठी रणबीर आपल्या लाडक्या लेकीला घेऊन गेला होता. यासंबंधितचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले आहेत.अभिनेता रणबीर कपूर ( RANBIR KAPOOR ) व राहा कपूरचे व्हिडीओ सेलिब्रिटी फोटोग्राफर्सने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. आज सकाळी रणबीर लेक राहाबरोबर नव्या घराची पाहणी करण्यासाठी पोहोचला होता. यावेळी रणबीर कूल लूकमध्ये पाहायला मिळाला. तर चिमुकली राहा स्टायलिश लूकमध्ये दिसली.राहाने डेनिम जीन्स शॉर्ट्स आणि टी-शर्ट घातलं होतं. तसंच तिच्या केसांचा छोटासा बो (BOW) घातला होता आणि त्याच्या बाजूला छोटेस हेअरपिन लावले होते. या लूकमध्ये राहा फारच गोड दिसत होती. व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये राहा बाबा रणबीरचा ( RANBIR KAPOOR ) बोट पकडून चालताना दिसत आहे. राहाच्या या गोड अंदाजाने पुन्हा एकदा तिने सगळ्यांची मनं जिंकली आहेत.दरम्यान, रणबीर-आलियाचं २०२२मध्ये लग्न झालं होतं आणि त्यानंतर त्याचवर्षी ६ नोव्हेंबरला राहाचा जन्म झाला होता. दोघांनी एक वर्ष राहाचा चेहरा लपवला. गेल्या वर्षी ख्रिसमसच्या मुहूर्तावर रणबीर व आलियाने राहाची पहिली झलक दाखवली. तेव्हापासून राहाचे क्यूट व्हिडीओ नेहमी व्हायरल होतं असतात.रणबीर कपूरच्या ( RANBIR KAPOOR ) कामाबद्दल बोलायचं झालं तर, तो शेवटचा संदीप रेड्डी वांगाच्या 'ॲनिमल' चित्रपटात झळकला होता.

# अपूर्वाचा अंगावर शहारे आणणारा ट्रेलर!

बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री तारा सुतारिया (TARA SUTARIA) ही तिच्या चित्रपटांमुळे चर्चेत असते. चित्रपट निर्माता करण जोहरच्या 'स्टुडंट ऑफ द इयर 2' या चित्रपटातून हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण करणाऱ्या ताराने अल्पावधीतच प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे. ताराचा 'अपूर्वा' (APURVA) हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. तिच्या या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला आहे. या ट्रेलरमधील ताराच्या अभिनयाचं सध्या अनेकजण कौतुक करत आहेत. तारा सुतारिया ही 'अपूर्वा' या थ्रिलर चित्रपटाद्वारे ओटीटी प्लॅटफॉर्मवर पदार्पण करणार आहे. 'अपूर्व' या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रेक्षकांच्या भेटीस आला आहे. DISNEY PLUS HOTSTAR या ओटीटी प्लॅटफॉर्मच्या YOUTUBE चॅनेलवर 'अपूर्व' चित्रपटाचा ट्रेलर शेअर करण्यात आला आहे.

ट्रेलरमध्ये दाखवण्यात आलं आहे की, अपूर्वा नावाच्या तरुणीचे लग्न सिद्धार्थ नावाच्या मुलाशी होणार आहे. अपूर्वा आणि सिद्धार्थ यांच्या लग्नाची तयारी सुरु असते अशातच काही गुंड अपूर्वाचे अपहरण करतात. या गुंडांच्या तावडीतून आपला जीव वाचवण्यासाठी अपूर्वा धडपड करते. 'अपूर्वा' या चित्रपटात तारा सुतारियासोबतच अभिषेक बॅनर्जी, राजपाल यादव आणि धैर्य करवा या कलाकारांनी प्रमुख भूमिका साकारली आहे. 'अपूर्वा' हा चित्रपट 15 नोव्हेंबर रोजी रिलीज होणार आहे. हा चित्रपट DISNEY PLUS HOTSTAR या ओटीटी प्लॅटफॉर्मवर रिलीज होणार आहे. काही दिवसांपूर्वी 'अपूर्वा' या चित्रपटाचा टीझर देखील रिलीज झाला होता. या टीझरला देखील नेटकऱ्यांची पसंती मिळाली होती. तारा सुतारियाचा गेल्या वर्षी 'एक व्हिलन रिटर्न्स' (EK VILLAIN RETURNS ) हा चित्रपट रिलीज झाला होता.जॉन अब्राहम (JOHN ABRAHAM), अर्जुन कपूर (ARJUN KAPOOR), आणि दिशा पाटनी (DISHA PATANI) यांनी देखील या चित्रपटात प्रमुख भूमिका साकारली होती. या चित्रपटानंतर तारा सुतारियाच्या आगामी चित्रपटांची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत होते. तारा सुतारिया ही सोशल मीडियावर देखील ॲक्टिव असते. इन्स्टाग्रामवर तिचे 8.8 मिलियन फॉलोवर्स आहेत.



# अयोध्येत पोहोचली कंगना रनौत

कंगना रनौत ही गुरुवारी (26 ऑक्टोबर) अयोध्येत (AYODHYA) पोहोचली. तिथे कंगनानं भगवान रामलल्लाचे दर्शन घेतले आणि पूजा देखील केली. कंगनातने अयोध्येत उभारण्यात येणाऱ्या भव्य राम मंदिराच्या (RAM MANDIR) बांधकामाची पहाणी देखील केली. कंगनानं अयोध्येतील तिचे काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. कंगनानं सोशल मीडियावर शेअर केलेल्या फोटोमध्ये कंगना ही श्रीरामाचे दर्शन घेताना दिसत आहे. या फोटोला कंगनानं कॅप्शन दिलं, "आओ मेरे राम! व्वा! माझ्यावर श्री हरी विष्णूंचा आशीर्वाद आहे, मी त्यांची भक्त आहे आणि आज मला त्यांचा इतका आशीर्वाद मिळाला आहे की, मला श्री हरी विष्णू परम पूजनीय अवतार, महान धनुर्धारी, अप्रतिम योद्धा, तपस्वी राजा, मरिदापुरुषोत्तम श्री राम यांची जन्मभूमी बघायला मिळाली. माझ्या तेजस या चित्रपटात रामजन्मभूमीची विशेष भूमिका आहे, त्यामुळे माझ्या मनात विचार आला की, मी रामलल्ला यांचे दर्शन घ्यावे,धन्य भाग मेरे राम, मेरे राम श्री रामाचे दर्शन घेतल्यानंतर कंगनानं पत्रकारांसोबत संवाद देखील साधला. यावेळी ती म्हणाली, 'रामलल्लाचे मंदिर बांधले जात आहे.

# लॉकडाऊनमध्ये कीर्तन शिकले

आचार्य अत्रे कट्टा येथे सध्या रंगभूमीवर चर्चेत असलेल्या 'जन्मवारी' या नाटकाचा प्रवास उलघडला बाहे. या नाटकाच्या टीमने कट्ट्यावर प्रेक्षकांशी मनमोकळा संवाध साधत या नाटकाची माहिती दिली. ठाण्यातील नौपाडा येथील जिजाऊ उद्यानात असलेल्या अत्रे कट्ट्यावर विविध सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. नुकताच येथे रंगभूमीवर चर्चेत असलेल्या 'जन्मवारी' या नाटकाच्या टीमने गप्पा रंगल्या. या कार्यक्रमाच्या निमित्ताने एक मनमोकळा सुसंवाद साधण्यासाठी या कट्ट्यावर स्वतः लेखिका-दिग्दर्शिका हर्षदा बोरकर, संगीतकार मंदार देशपांडे आणि अभिनेत्री कविता जोशी, अमृता मोडक आणि शर्वरी कुळकर्णी-बोरकर उपस्थित होते.



# भरत जाधव यांचा 'लंडन मिसळ' चित्रपट

जालिंदर कुंभार दिग्दर्शित 'लंडन मिसळ' हा चित्रपट येत्या 8 डिसेंबरला प्रदर्शनासाठी सज्ज झाला आहे. भारतात तसेच लंडनमध्ये शूट झालेल्या या चित्रपटाच्या माध्यमातून बऱ्याच वर्षांनी अभिनेता भरत जाधव (BHARAT JADHAV) हा महत्त्वपूर्ण भूमिकेत पडद्यावर प्रेक्षकांचे मनोरंजन करताना दिसणार आहेत. आपल्या भूमिकेतून प्रेक्षकांना सरप्राईज देणाऱ्या भरत जाधवनं पहिल्यांदाच चित्रपटासाठी रॅप गायन देखील केलं आहे. श्री. रवींद्रनाथ टागोर यांच्या एका नाटकावरून 'लंडन मिसळ' हा चित्रपट प्रेरित आहे, हे या चित्रपटाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. 'लंडन मिसळ' या चित्रपटात ऋतुजा बागवे, रितिका श्रोत्री, माधुरी पवार, गौरव मोरे, निखील चव्हाण, ऋतुराज शिंदे आणि सुनील गोडबोले हे कलाकार प्रमुख भूमिकेत आहेत तर भरत जाधव एका हटके भूमिकेत प्रेक्षकांचं निखळ मनोरंजन करताना दिसणार आहेत आणि ही प्रेक्षकांसाठी मोठी मेजवानी असेल. आदिती आणि रावी या लंडनमध्ये राहणाऱ्या दोन सख्ख्या बहिणींची कथा 'लंडन मिसळ' या चित्रपटामध्ये दाखवण्यात येणार आहे. गौरव मोरे यांनी 'लंडन मिसळ' या चित्रपटाचं पोस्ट सोशल मीडियावर शेअर करुन कॅप्शनमध्ये लिहिलं, 'तिखट तर्री घालून 440 व्होल्टचा झटका द्यायला येत आहे. 'लंडन मिसळ' फॅमिली मनोरंजनाची झणझणीत मेजवानी! 8 डिसेंबर पासून तुमच्या जवळच्या चित्रपटगृहात' 'लंडन मिसळ' हा चित्रपट 8 डिसेंबर रोजी रिलीज होणार आहे. 'लंडन मिसळ' या चित्रपटाचे निर्माते अमित बसनेट, सुरेश गोविंदराय पै आणि आरोन बसनेट आहेत तर सह-निर्माते सानिस खाकुरेल आहेत.

# मुलांना सज्ञान करण्याची गरज!

## कोलकाता बलात्कार प्रकरणावर सूर्याची संतप्त प्रतिक्रिया

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**कोलकाता येथील आर. जी. कार वैद्यकीय महाविद्यालयातील निवासी डॉक्टरवर झालेला बलात्कार आणि त्यानंतर तिच्या निर्घृण हत्येच्या घटनेने देशभर खळबळ उडाली आहे. या घटनेचा देशभरातून निषेध व्यक्त केला जात आहे. केवळ सामान्य लोकच नाही तर सेलिब्रिटीही वेगवेगळ्या प्रकारे निषेध व्यक्त करुन आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी करत आहेत. आता भारतीय टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवनेही आपली प्रतिक्रिया देताना एक महत्त्वाचा संदेश आपल्या इन्स्टा स्टोरीच्या माध्यमातून शेअर केला आहे.**




सूर्यकुमार यादवने आपल्या इन्स्टाग्रामवर एक स्टोरी पोस्ट केली आहे. ज्यामध्ये त्यानी एक खास संदेश दिला आहे. त्याने जुनी समज बदलण्याबद्दल आवाहन केले आहे. त्यानी स्टोरीमध्ये लिहिलं की, 'तुमच्या मुलीचे रक्षण करा' ही संकल्पना चुकीची असल्याचे म्हटलं आहे. कारण आता 'तुमच्या मुलाला सज्ञान करण्याची गरज आहे' यावर जोर दिला आहे. याशिवाय सूर्यकुमार यादवने आपल्या भावाला, पतीला, मित्राला आणि वडिलांना सज्ञान करण्याची गरज असल्याचंही म्हटलं आहे.याआधी रोहित शर्मा आणि इतर अनेक क्रिकेटपटूंनीही आरजी हत्याकांड बलात्कार प्रकरणावर प्रतिक्रिया दिल्या आहेत. सौरव गांगुलीनेही या प्रकरणी यापूर्वी प्रतिक्रिया दिली होती आणि दोषींना कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी केली होती. सौरव गांगुली म्हणाला होता, मला आशा आहे की दोषींची ओळख पटवून त्यांना शिक्षा होईल. ज्या पद्धतीने लोक निषेध करत आहेत, ही घटना जगात कुठेही घडली असती तर लोकांनी त्याच पद्धतीने आवाज उठवला असता. कारण ही खूप दुर्दैवी घटना आहे, त्यामुळे कठोर कारवाई व्हायला हवी.पीडितेच्या कुटुंबाला न्याय मिळावा व आरोपीला कठोरात कठोर शिक्षा मिळावी यासाठी देशभरातील निवासी डॉक्टरांच्या संघटना रस्त्यावर उतरल्या आहेत. दुसऱ्या बाजूला या घटनेचा तपास जसजसा पुढे सरकतोय तसतशी नवीन व धक्कादायक माहिती समोर येत आहे. दरम्यान, पीडितेच्या आई-वडिलांनी सीबीआयला सांगितलं की, रुग्णालयातील काही इंटर्न व डॉक्टर या गुन्ह्यात सहभागी असू शकतात.

एका अधिकाऱ्याने याबाबतची माहिती दिली आहे. यासह मृत तरुणीच्या आई-वडिलांचा ज्या-ज्या लोकांवर संशय आहे, त्यांच्या नावांची यादी त्यांनी सीबीआयला दिली आहे. कोलकाता उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर सीबीआय या प्रकरणाचा तपास करत आहे.सूर्यकुमार यादवने आपल्या इन्स्टाग्रामवर एक स्टोरी पोस्ट केली आहे. ज्यामध्ये त्यानी एक खास संदेश दिला आहे. त्याने जुनी समज बदलण्याबद्दल आवाहन केले आहे. त्यानी स्टोरीमध्ये लिहिलं की, 'तुमच्या मुलीचे रक्षण करा' ही संकल्पना चुकीची असल्याचे म्हटलं आहे. कारण आता 'तुमच्या मुलाला सज्ञान करण्याची गरज आहे' यावर जोर दिला आहे. याशिवाय सूर्यकुमार यादवने आपल्या भावाला, पतीला, मित्राला आणि वडिलांना सज्ञान करण्याची गरज असल्याचंही म्हटलं आहे.याआधी रोहित शर्मा आणि इतर अनेक क्रिकेटपटूंनीही आरजी हत्याकांड बलात्कार प्रकरणावर प्रतिक्रिया दिल्या आहेत. सौरव गांगुलीनेही या प्रकरणी यापूर्वी प्रतिक्रिया दिली होती.

### प्रकरणाचा तपास सीबीआयकडे

**दोषींना कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी केली होती. सौरव गांगुली म्हणाला होता, मला आशा आहे की दोषींची ओळख पटवून त्यांना शिक्षा होईल. ज्या पद्धतीने लोक निषेध करत आहेत, ही घटना जगात कुठेही घडली असती तर लोकांनी त्याच पद्धतीने आवाज उठवला असता. कारण ही खूप दुर्दैवी घटना आहे, त्यामुळे कठोर कारवाई व्हायला हवी.पीडितेच्या कुटुंबाला न्याय मिळावा व आरोपीला कठोरात कठोर शिक्षा मिळावी यासाठी देशभरातील निवासी डॉक्टरांच्या संघटना रस्त्यावर उतरल्या आहेत. दुसऱ्या बाजूला या घटनेचा तपास जसजसा पुढे सरकतोय तसतशी नवीन व धक्कादायक माहिती समोर येत आहे. दरम्यान, पीडितेच्या आई-वडिलांनी सीबीआयला सांगितलं की, रुग्णालयातील काही इंटर्न व डॉक्टर या गुन्ह्यात सहभागी असू शकतात. एका अधिकाऱ्याने याबाबतची माहिती दिली आहे.**

# गौतम गंभीरने विराट कोहलीचे केले कौतुक!

## तो एक असा खेळाडू आहे जो देशासाठी दीर्घकाळ खेळेल

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १६ वर्षे पूर्ण केली आहेत, त्याने २००८ मध्ये श्रीलंकेविरुद्धच्या वनडे मालिकेतून पदार्पण केले होते. श्रीलंका मालिकेच्या काही महिन्यांपूर्वीच विराटने अंडर-१९ विश्वचषकात टीम इंडियाला जेतेपद मिळवून देऊन इतिहासात आपले नाव नोंदवले होते. आज विराट कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १६ वर्ष पूर्ण केल्यानंतर गौतम गंभीरचा विराट कोहलीबद्दल बोलतानाचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.**




विराट कोहलीबद्दल बोलताना गौतम गंभीर म्हणाला की, 'जेव्हा त्याने श्रीलंकेत पदार्पण केले होते, तेव्हा मला आठवते की तो पदार्पणाच्या सामन्यात लवकर आऊट झाला होता. पण तो ज्या पद्धतीने नेटमध्ये खेळायचा त्यावरुन मला माहित होते की, तो एक असा खेळाडू आहे जो देशासाठी दीर्घकाळ खेळेल. त्याच्याकडे इतकी प्रतिभा होती की तो जे काही करत होता त्याबद्दल मला आश्चर्य वाटत नव्हते.'गौतम गंभीर पुढे म्हणाला,'तो एक महान खेळाडू आहे. त्याला आपल्या संघाला सामने कसे जिंकून द्यायचे, हे त्याला चांगल्या प्रकारे माहित आहे. त्याची वृत्ती आणि स्वभाव चांगला आहे. सुरुवातीला भारतीय संघात आल्यानंतर तो ज्या प्रकारे भारताला सामने जिंकून देत होता, हे त्याच्या संपूर्ण क्रिकेट कारकिर्दीसाठी सर्वात मोठ्या सकारात्मक गोष्टी ठरल्या. त्यानंतर त्याने टीम इंडियासाठी सलामी दिली होती. पहिल्या एकदिवसीय सामन्यात त्याने २२ चेंडूत १२ धावा केल्या, ज्यात एका चौकाराचा समावेश होता.

### व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल

कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले, तेव्हा टीम इंडियाची धुरा महेंद्रसिंग धोनीच्या हाती होती. ज्या सामन्यातून विराट कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्या सामन्यातील भारताच्या प्लेइंग इलेव्हनमधील ९ खेळाडूंनी आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. त्यापैकी रोहित शर्मा हा एकमेव खेळाडू आहे जो अजूनही आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये खेळत आहे.टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १६ वर्षे पूर्ण केली आहेत, त्याने २००८ मध्ये श्रीलंकेविरुद्धच्या वनडे मालिकेतून पदार्पण केले होते. श्रीलंका मालिकेच्या काही महिन्यांपूर्वीच विराटने अंडर-१९ विश्वचषकात टीम इंडियाला जेतेपद मिळवून देऊन इतिहासात आपले नाव नोंदवले होते. आज विराट कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १६ वर्ष पूर्ण केल्यानंतर गौतम गंभीरचा विराट कोहलीबद्दल बोलतानाचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.विराट कोहलीबद्दल बोलताना गौतम गंभीर म्हणाला की, 'जेव्हा त्याने श्रीलंकेत पदार्पण केले होते.